"रमाई आवास योजनेचे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या आर्थिक विकासातील योगदान - एक चिकित्सक अभ्यास".

विशेष संदर्भ :- नांदेड जिल्हा

(सन 2010 ते 2025)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विज्ञान शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

मायादेवी दिगांबर सुर्यतळे

मो. 9284343328

Email ID: mayasuryatale@gmail.com

: मार्गदर्शक :

प्रा. सुर्यकांत त्र्यंबकराव पवार

सहयोगी प्राध्यापक

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय सोनखेड,

ता.लोहा जि. नांदेड

मो. 9763084130

संशोधन केंद्र

: सामाजिकशास्त्रे संकुल :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसेंबर 2024

प्रस्तावना (Introduction) :-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी 1951 मध्ये आर्थिक नियोजनाचा स्वीकार करून मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारण्यात आली. वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून आर्थिक विकास होण्यासाठी आर्थिक घटकांचा विकास होणे आवश्यक आहे.

भारत हा विकसनशील देश म्हणून ओळखला जातो. आजच्या प्रगतशील जगाची मुख्य समस्या ही आर्थिक विकासाची आहे. सामान्यत: आर्थिक विकासाचा अर्थ सर्व आर्थिक क्षेत्रातील उत्पादनाचा स्तर वाढवणे आहे. अधिक विस्तृत अर्थाने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, दारिद्र्यता दूर करणे आणि सामान्य जीवन स्तरामध्ये वाढ करणे होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. भारताच्या किर्तीवंत सुपुत्रांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. भारत देशाच्या इतिहासातील पहिले सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. समाजाच्या अस्पृश्य म्हणून हिणविल्या गेलेल्या अगदी तळागाळातील वर्गाच्या पुनरूत्थानासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक पातळीवर तेव्हापासूनच संघर्ष सुरू होता. देशभरातील अस्पृश्य समाजाला एकवटून

संघटित करून सामाजिक समतेच्या ध्येयाप्रत जाण्याच्या दृष्टीने राजकीय मार्ग कसा अवलंबवायचा या विषयी त्यांनी कार्य केले.

डॉ. बाबासाहेबांनी तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तिनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकवले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या एकंदर कार्यात सामाजिक सुधारणा विशेषत: दलितोध्दाराच्या चळवळीला विशेष महत्व आहे. ते स्वत: एका अस्पृश्य कुटुंबात जन्मल्याने त्यांना अस्पृश्यतेचे अनेक वाईट अनुभव आले होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करणे आणि अस्पृश्यांचा सर्वांगीण विकास करणे हे आपल्या जीवनाचे पहिले ध्येय ठेवले होते.

शिक्षण समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्काची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले.

अनुसूचित जातीच्या व्यक्तिंना त्यांच्या बिकट परिस्थितीमुळे स्वत:च्या उत्पन्नातून चांगल्या प्रकारे पक्की घरे बांधणे शक्य होत

नाही. ग्रामीण भागातील बहुतांश लोक कच्च्या घरामध्ये राहतात. म्हणून राज्य शासनाने अनुसूचित जातीच्या लोकांना त्यांचे राहणीमान उंचावण्याचा व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा म्हणून रमाई घरकुल आवास योजना राबविण्यात आली.

राज्य सरकारच्या सामाजिक स्तरातील सहाय्यक राज्यातील गरीब लोकांच्या घरातील योजनेसाठी एक योजना ही सरकारच्या या योजनेच्या अंतर्गत 1.5 लाख लोकांच्या घरात राहण्यासाठी स्वीकृत आहे. रमाई आवास योजना या प्रकारच्या लोकांकडे जाणे ही कमकुवत आहे. जी अल्पसंख्याक जातीय जातींच्या अधिनियमीत सरकारची योजना आहे. ज्या अंतर्गत 1 लाखांच्या घरात राहण्याचा लक्ष्य आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या घराचा प्रश्न सुटावा यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्की घरे बांधून देण्यासाठी शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना शासन निर्णय 15/11/2008 नुसार सुरू केली आहे.

संबधीत संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Literature) :-

प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरून पूर्वी झालेल्या संशोधन संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. संदर्भ साहित्यात विविध संशोधकांनी

केलेले शोध प्रबंध, लघुशोध प्रबंध, संशोधन लेख, मुलभूत ग्रंथ, शासकीय अहवाल आदिंचा आढावा संदर्भ साहित्याच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची निवड :-

भारतासारख्या विकसनशील देशात मुबलक प्रमाणात संसाधन असून देखील ज्ञानाच्या अभावामुळे त्यांचा पुरेपूर वापर करता येत नाही. म्हणून देशात आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. दारिद्रय, बेकारी, वाढती लोकसंख्या, उत्पन्न वाटपातील विषमता, आर्थिक विकासात बाधा निर्माण होत आहे. अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास साध्य करण्यासाठी सरकार वेळोवेळी कार्य करत असते. यासाठी खेडयातील लोकांना प्रोत्साहन देऊन खेडयातील व शहरातील लोकांना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांना रमाई आवास योजना यासारख्या वेगवेगळया योजना राबवून त्यांच्या प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरापर्यंत ही योजना कशी पोहचविता येईल हा उद्देश ठेवून यासारख्या योजनाची राज्यशासाने अंमलबजावणी केली पाहिजे.

ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमानाचा प्रश्न सुटावा, त्यांचे आर्थिक जीवन हे चांगल्या प्रकारे त्यांना जगता यावे म्हणून ही योजना ग्रामीण आणि शहरी भागातील जे काही अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थी आहेत अशा लाभार्थ्यांना शासनाने रमाई आवास

योजना राबवून खेड्या-पाड्यातील, ग्रामीण भागातील जे ऊसतोड कामगार, ज्यांना राहायला थोडासा सुध्दा निवारा नाही यासाठी या योजनेची सुरूवात करून गरीबातील गरीब आणि गरजू नागरिकांना या योजनेचा लाभ होईल या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने ही योजना राबविण्यामागचा एकच उद्देश आहे की, अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील कुटूंबाचे जीवनमान उंचवावे व त्यांचा राहणीमानाचा प्रश्न सुटावा स्वत:च व हक्काची पक्की घरे राहावीत. लोकांना राहण्यासाठी पक्की घरे निर्माण करून देणे, प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहामध्ये आणणे.

म्हणून महाराष्ट्र शासनाने रमाई आवास योजना ही प्रत्येक ग्रामीण व शहरी भागात घरोघर पोहचवण्याचे काम हाती घेतले आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Study Subject) :-

नांदेड जिल्हा गोदावरीच्या खोऱ्यात महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्वेला वसलेला जिल्हा असून याला लागून आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या सीमा आहेत. महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सीमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे. जिल्ह्यात एकूण 16 तालुके आहेत. जिल्ह्याचा उत्तर आणि ईशान्य भाग सातमाळाचे डोंगर व मुदखेडच्या टेकड्यांनी व्यापलेला असून जिल्ह्याच्या दक्षिण नैॠत्य सीमेवर बालाघाटाचे डोंगर आहे.

नांदेड जिल्हयाचा विकास करण्यासाठी शासनातर्फे विविध योजना व विकास कार्यक्रम राबविले जातात. या विविध योजनेपैकी रमाई आवास योजना ही एक महत्त्वाची आहे. तिच्या माध्यमातून जिल्हयातील प्रत्येक लोकांना ग्रामीण आणि शहरी अनुसूचित जाती व नवबौध्द घटाकांतील जे काही लोकसंख्या आहे त्यांना राहण्यासठी अनुसूचित जाती व नवबौध्द कुटूंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर किंवा कच्च्या घराच्या जागेवर 269 चौरस फुटाचे पक्की घरे बांधून देण्यासाठी रमाई आवास घरकुल योजना सन 2009-10 पासून सुरू आहे.

रमाई आवास योजनेचा अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या आर्थिक विकासातील जे कार्य आहे ते ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील रमाई आवास योजनेचा कालावधी हा सन 2010 ते 2025 पर्यंत घेण्यात आला आहे. तसेच 2010 ते 2025 या कालावधी दरम्यान लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. सदरील योजनेचे जे काही लाभार्थी आहेत अशा लाभार्थ्यांनी रमाई आवास योजनेचा किती प्रमाणात लाभ घेतला आणि किती प्रमाणात लाभ घेतला नाही याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा शहरी विभागासाठी नगरपरिषद, नगरपालिका/ महानगरपालिका या स्थानिक यंत्रणा मार्फत करण्यात येते.

घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कलाम खर्चाची मर्यादा 132000 व नक्षलग्रस्त डोंगराळ क्षेत्रासाठी 142000 व नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका व मुंबई विकास प्राधिकरण क्षेत्र यांच्यासाठी रू.2.50 लक्ष इतके आहे.

ग्रामीण भागातील व शहरी भागातील नागरिक हा अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील असावा लागतो. लाभार्थी हा कमीत कमी 15 वर्षापासून महाराष्ट्रात वास्तव्यास असला पाहिजे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research) :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील दिलेली उद्दिष्टे निश्चित करून त्या आधारे संशोधन करण्यात येणार आहे.

1. नांदेड जिल्ह्यातील शासनाने चालविण्यात आलेल्या रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

2. रमाई अवास योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौध्दांना होणारा वित्तीय पुरवठ्याचा अभ्यास करणे.

3. रमाई आवास योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांची ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील झोपडपट्टी नाहीशी करून त्यांना पक्की घरे देवून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा आणि आर्थिक सहाय्य करून त्यांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

4. नांदेड जिल्ह्यातील शासनाने राबविलेल्या रमाई आवास योजनेतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जी लोकसंख्या आहे या योजनेचा यश व अपयशाचा अभ्यास करणे.

5. ग्रामीण भागातील व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जी लोकसंख्या आहे, गरजू व्यक्तिंना पक्की घरे दुर्गम भागामध्ये राहणारे गरिब कुटूंब, दुर्बल घटक, अपंग अशा

लाभार्थ्यांपर्यंत ही योजना कशी पोहचविता येईल याचा अभ्यास करणे.

6. रमाई आवास योजनेमुळे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा रितीने होईल त्यांचे मूल्यमापन करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये (Hypothesis of Research) :-

1. रमाई आवास योजनेला राज्य शासनाकडून होणाऱ्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास करणे.

2. रमाई आवास योजनेत लाभार्थ्यांना होणाऱ्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास करणे.

3. रमाई आवास योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे आणि त्यांना आर्थिक सहाय्य पुरवण्यास मदत होत आहे.

4. ग्रामीण क्षेत्रातील प्रगतीसाठी भविष्यात ही योजना चालू ठेवणे आवश्यक आहे.

5. रमाई आवास योजनेच्या कामामुळे दारिद्रयरेषेखालील राहणाऱ्या लाभार्थ्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली.

६. शासकीय आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य निराशावादी आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :-

संशोधन पध्दती निवड करण्यात आलेल्या विषयाचे अध्ययन करण्यासाठी अभ्यास पध्दतीची योजना तयार करणे संशोधकास अत्यावश्यक असते. सामाजिक व आर्थिक जीवनाविषयी सामाजिक घटनेचे अध्ययन करते. यासाठी अभ्यास पध्दतीची योजना तयार केली आहे. तर विशिष्ट कालावधीपर्यंत अभ्यासाचे हेतू पूर्ण होऊ शकते. संकलित केलेली तथ्य पडताळून नवीन सिध्दांत प्रतिपादन करता येते. संशोधकास समाजाविषयीचे ज्ञान व माहिती मिळणे शक्य होते. म्हणून समाज, सामाजिक घटना, आर्थिक घटना, वास्तविक घटना यामध्ये कार्यकारण संबंध प्रस्थापित करता येते.

याकरिता नांदेड जिल्हयातील एकूण 16 तालुके आणि गावे आहेत. लाभधारकांची संख्या बरीच जास्त असल्यामुळे सर्व लाभधारकांची मुलाखत घेऊन प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील 30 लाभार्थ्यांची मुलाखत घेऊन नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन करीत असताना ते संशोधन, शास्त्रशुध्द व अचूक व्हावे, संबंधित विषयाची उद्दिष्ट्ये साध्य करणे आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरूप संशोधन पध्दतीच्या आधारे सांख्यिकीय आकडेवारीच्या साहाय्याने लाभारर्थ्यांनी रमाई आवास

योजनेचा लाभ घेतलेल्या लाभारर्थ्यांचे निरिक्षण करून त्यांचा या योजनेबद्दल असलेला उद्देश आणि माहिती घेऊन विश्लेषणात्मक पध्दतीने (सरासरी पध्दतीने) स्पष्टीकरण केले जाणार आहे.

नमुना निवड पध्दत :-

नांदेड जिल्ह्यातील रमाई आवास योजनेचे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या घटकांच्या आर्थिक विकासातील योगदान - एक चिकित्सक अभ्यास. या संशोधन विषयावरील कार्य करण्यासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड प्रकारातील यादृच्छिक पध्दतीने नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे.

यासाठी नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यातील, प्रत्येक तालुक्यातील 30 लाभार्थी आणि अशा एकूण 480 लाभधारकांची सन 2010 ते 2025 या 15 वर्षाच्या कालावधी मध्ये लाभार्थ्यांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection) :-

सामाजिक घटनाच्या अध्ययनामध्ये वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करून त्या आधारे वस्तुनिष्ठ पध्दतीने संशोधन करावे लागते. त्याकरिता कोणत्याही घटनेच्या संबंधित वास्तविक तथ्याचे संकलन करणे अतिशय महत्वाचे असते.

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्याचे संकलन दोन पध्दतीने केले आहे.

1. **प्राथमिक तथ्य (माहिती) (Primary data) :-**

प्राथमिक तथ्य (माहिती) संकलित करण्यासाठी मुलाखत, अनुसूची व प्रश्नावली निरिक्षण या तंत्राचा वापर केला जाणार आहे.

नांदेड जिल्हयातील 16 तालुक्यातील, प्रत्येक तालुक्यातील 30 लाभार्थ्यांची मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली जाणार आहे. याशिवाय गरजेनुसार प्रत्यक्षरित्या भेट देऊन सन 2010 ते 2025 या 15 वर्षाच्या कालावधी मध्ये मुलाखतीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

गावातील ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच, कुटुंब प्रमुख इतर संबंधित व्यक्ति तसेच शहरी क्षेत्रात, जिल्हा समन्वय अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी संबंधित अधिकारी यांची संबंधित विषयावर मुलाखत व प्रश्नावलीच्या माध्यमातुन माहिती संकलित केली जाईल.

2. **दुय्यम तथ्य (माहिती) (Secondary data) :-**

प्राथमिक तथ्य संकलित केल्यानंतर प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून दुय्यम तथ्य मिळवण्यासाठी दैनिक वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ, मासिकातील आकडेवारी, शोधप्रबंध विषयानुरूप मासिके, नियतकालिके, संशोधन लेख, शासनाचे वेळोवेळी प्रकाशित होणारे वार्षिक अहवाल,

विविध पुस्तके, कागदपत्रे, संपादित लेख, माहितीपुस्तिका, सबंधित मंत्रालयाचे अहवाल, इंटरनेट साहित्य व संकेतस्थळे अशा सर्व बाबींचा वापर दुय्यम तथ्य संकलनासाठी केला जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitations of The Study) :-

संशोधन समस्येसंबंधी तथ्य संकलनासाठी संशोधन क्षेत्र निश्चित करणे आवश्यक असते. त्याशिवाय योग्य माहिती मिळवण्यास व संशोधनाची दिशा मिळणे अशक्य असते. शासन स्तरावर विविध योजना राबविल्या जातात. परंतु संशोधनासाठी निवडलेली नांदेड जिल्हयातील- 'रमाई आवास योजनेचे अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या आर्थिक विकासातील योगदान' हा अभ्यास विषय अत्यंत महत्वपूर्ण असून या संशोधन विषयाचा उपयोग समाजाला पर्यायाने देशाला निश्चितपणे होऊ शकतो.

प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी हा सन 2010 ते 2025 या 15 वर्षाच्या कालावधीमध्ये रमाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळालेला लाभ तसेच योजनेतील यश-अपयशाचा सुक्ष्मपणे अभ्यास केला जाणार आहे.

संबंधित संशोधन विषय नांदेड जिल्हयापुरताच मर्यादित असणार आहे. त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा क्षेत्र नांदेड जिल्हयातील रमाई आवास योजनेतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांपुरताच सीमित राहिल.

प्रकरणाची (रूपरेषा) मांडणी :-

प्रस्तुत संशोधन विषयात एकूण 7 प्रकरण असणार आहेत.

प्रकरण 1 ले :- प्रस्तावना.

प्रकरण 2 रे :- संबंधित संशोधन साहित्याचा आढावा.

प्रकरण 3 रे :- नांदेड जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या ग्रामीण आणि शहरी भागातील सामाजिक आणि आर्थिक स्थिती.

प्रकरण 4 थे :- नांदेड जिल्हयातील रमाई आवास योजनेचे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे संख्यात्मक विश्लेषण.

प्रकरण 5 वे :- नांदेड जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांचा अभ्यास.

प्रकरण 6 वे :- निष्कर्ष आणि शिफारशी.

संदर्भसूची (Bibliography) :-

1. प्रदीप आगलावे, (2002) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
2. वैद्य. एन. बी., मराठवाड्यातील अर्थव्यवस्था (आकडेवारीचा आशय), नागपूर, श्री मंगेश प्रकाशन, 2003.
3. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती, नागपूर, 1996.
4. भारतीय अर्थव्यवस्था, दत्त व सुंदरम, एस.चाँद प्रकाशन, नवी दिल्ली, 2012.
5. भारतीय जनगणना अहवाल (2011), महारजिस्टर आणि जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार.
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, 2023-2024, महाराष्ट्र राज्य, अर्थ आणि सांख्यिकी संचनालय, मुंबई-2023-2024.
7. महाराष्ट्र राज्य अर्थ आणि सांख्यिकी संचनालय, मुंबई-2023-2024.
8. योजना मासिक, (मराठी) भारत सरकार, जून 2015.
9. लोकराज्य (जून), 2014.
10. वर्तमानपत्र- सकाळ, महाराष्ट्र टाईम्स.

संकेत स्थळ (Websites)

1. https://www.mahaawaas.org
2. https://www.samajkalyannanded.in
3. https://www.myscheme.gov.in
4. https://www.nwcmc.gov.in
5. https://socialjusticenanded.in

संशोधक	मार्गदर्शक
मायादेवी दिगांबर सुर्यतळे	**प्रा. सुर्यकांत त्र्यंबकराव पवार** सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय सोनखेड, ता.लोहा जि.